।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.१२ जानेवारी २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३ रा

## पतीच्या आकस्मित निधनाच्या विरहाने दुसऱ्याच दिवशी पत्नीची आत्महत्या;लग्नानंतर एका महिन्यातच पती-पत्नी दोघांचाही मृत्यू

### सांगोला तालुक्यातील वाढेगाव येथील दुर्दैवी घटना



सांगोला: पतीच्या मृत्यूचा विरह सहन न झाल्याने पत्नीने तिसऱ्याच्या दिवशीच ओढणीच्या साह्याने पत्र्याच्या शेडमध्ये लोखंडी अँगलला गळफास घेऊन जीवन संपवले. ही घटना गुरुवार ९ रोजी पहाटे ४:३० च्या सुमारास वाढेगाव (ता. सांगोला) येथे घडली. याबाबत अनिता निखिल घोंगडे (वय २३) असे मृत विवाहितेचे नाव आहे. याबाबत, ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिकारी यांनी खबर दिली आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

वाढेगाव येथील निखिल घोंगडे याचा ५ डिसेंबर २०२४ रोजी अनिता हिच्याशी थाटामाटात विवाह झाला होता. विवाहानंतर ८ डिसेंबर रोजी निखिल याने लग्नाची रिसेप्शन पार्टीही दिली होती. घरी मंगलकार्य झाल्यामुळे घरात आनंदाचे वातावरण होते. मात्र मंगळवार दि. ७ जानेवारी रोजी निखिल याचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे पत्नी अनिता हिला मानसिक धक्का बसल्याने ती निःशब्द होती.

बुधवारी निखिल याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रात्री घोंगडे कुटुंबीयांसमवेत निखिलची पत्नी अनिता असे सर्वजण मिळून घरात झोपले होते. गुरुवारी पहाटे ४:३० च्या सुमारास अनिता हिने पतीच्या मृत्यूचा विरह सहन न झाल्याने झोपेतून उठून घराच्या पाठीमागील पत्राशेड मधील लोखंडी अँगलला ओढणीच्या साह्याने गळफास घेतला.

दरम्यान, घरात झोपलेल्या ठिकाणी अनिता दिसून न आल्याने नातेवाइक तिचा शोध घेत असताना तिने पत्रा शेडमध्ये गळफास घेतल्याचे दिसून आले. नातेवाइकांनी तिला खाली उतरून तातडीने सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून तिचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे सांगितले.

निखिल घोंगडे याच्याशी लग्न केलेली अनिता ही आत्या वंदना शिरसावडे (रा. मालगाव, ता. मिरज, जि. सांगली) यांची मुलगी होती. अनिताला मामाच्या मुलाशी लग्न करायचे होते. त्यामुळे घरातील नातेसंबंधामुळे ५ डिसेंबर रोजी दोघांचा विवाह झाला होता आणि अवघ्या एकाच महिन्यात पती–पत्नीचा लग्नाला कोणाची दृष्ट लागली आणि दोघांचा थाटलेला राजसंसार अकस्मात मृत्यूमुळे मोडला.

**पतीच्या निधनानंतर तिसऱ्या विधीला पत्नीचा गळफास !**

निखिलचा ५ डिसेंबर २०२४ रोजी विवाह झाला. विवाहानंतर एक महिन्यातच अचानक निखिलचा ७ जानेवारी २०२५ रोजी मृत्यू झाला. पती निखिलच्या मृत्यूमुळे विरह सहन न झाल्याने पत्नी अनिता हिने गुरुवार ९ जानेवारी रोजी तिसऱ्याच्या विधी दिवशी गळफास घेऊन आत्महत्या करून जीवन संपवले.

पती–पत्नीच्या एकापाठोपाठ दुर्दैवी मृत्यूमुळे घोंगडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळलाच परंतु दोघांच्या मृत्यूमुळे अख्ख गाव हळहळ व्यक्त करत आहे.तसेच सांगोला तालुक्यातील अनेक जणांनी सोशल मिडिया वर दोघा पती पत्नीचे फोटो स्टेटसला ठेवले होते.

निखिल घोंगडे याच्या वयाच्या ६ व्या वर्षापासून दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या. त्यामुळे आई स्वाती दिगंबर घोंगडे यांनी स्वतःची एक किडनी त्यास देऊन त्याचे मुंबईतील खाजगी हॉस्पिटलमध्ये प्रत्यारोपण करून जीवदान दिले होते. त्यानंतर तो व्यवस्थित होता.लग्नानंतर अचानक ६ जानेवारी रोजी त्याला डेंग्यूचा ताप आला म्हणून पुन्हा मुंबईतील हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. त्या ठिकाणी निमोनिया आणि रक्तात कावीळ उतरल्याचे निदान झाले आणि त्यात निखिलचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## आईला शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या मुलाच्या डोक्यात जन्मदात्या बापानेच घातली कुऱ्हाड

### सांगोला तालुक्यातील हातीद गावातील घटना

सांगोला : आईला शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या मुलास जन्मदात्या बापाने रागाच्या भरात डोक्यात कुऱ्हाडीने दोन वेळा घाव घालून खून केला. ही घटना शुक्रवार १० जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास हातीद, ता. सांगोला येथील शिंपे वस्ती शाळेच्या पाठीमागे घडली. रोहिदास रामा पवार (१८) असे मृताचे नाव आहे.

याबाबत, बिरा बबन बंडगर (रा. हातीद, ता. सांगोला) यांनी फिर्याद दिली असून, पोलिसांनी आरोपी रामा किसन पवार (हातीद, ता. सांगोला)याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता १०३ (१), ३५१ (३) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल केला. याबाबत अधिक माहिती अशी की, हातीद येथील फिर्यादी यांच्या हद्दीतील सामायिक जमीन गट नंबर–२७७ मध्ये काटेरी झाडे झुडपे तोडून त्याचा कोळसा तयार करण्यासाठी पवार कुटुंबासह राहण्यास होते.

शनिवारी सायंकाळी मृत रोहिदास पवार याने त्याची आई गौरी पवार हीस कोणत्यातरी कारणावरून शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत होता. त्यावेळी वडील दोघांचं भांडण सोडवण्यासाठी मध्ये गेले असता मुलगा रोहिदास यांनी त्यांना ढकलून दिले. आपल्या डोळ्यासमोर मुलाने आपल्या पत्नीला मारहाण करत असल्याचा राग आरोपी यास सहन न झाल्याने त्याने स्वतः मुलगा रोहीदास याच्या डोक्यात कुन्हाडीने दोन वेळा घाव घालून त्याचा खून केला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. आज रविवार १२ जानेवारी न्यायालयात हजर केले जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी सांगितले. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पुजारी करीत आहेत.

## कडलासमध्ये एसटीचा ब्रेक फेल ७० प्रवासी आणि विद्यार्थ्यांचा प्राण वाचला

सांगोला:सांगोला आगार हे समस्याचे आगार झाले असून गुरूवार ९ जानेवारी रोज सकाळी ७.४० मिनिटांनी नराळे–सांगोला बस क्र. एम.एच. १४ बीटी २८३९ या गाडीचा कडलास गावात ब्रेक फेल झाल्याने तसेच सदरचा भाग हा सपाट व खड्ड्याचाअसल्यामुळे चालकाने प्रसंगावधान राखत ६० फुटावरती ही गाडी थांबवली आणि एसटीत असलेल्या ७० शालेय मुले व प्रवासी यांचा जीव वाचला.

सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागात एसटीची सेवा ही अवसानघातकी ठरत आहे. ग्रामीण भागातच या एसटीच्या पावणे तीनशेच्या आसपास फेऱ्या आहेत.पण आगारप्रमुखच अकार्यक्षम असल्यामुळे तालुक्यतील जनतेला ही सेवा मिळत नाही. गुरूवारी सकाळी नराळेहून सकाळी ६.१५ वाजता नराळे सांगोला ही बस नराळेहून सांगोल्याकडे येत होती. या एसटी बसमध्ये नराळे, हबिसेवाडी, डिकसळ, पारे, मानेवारी, पारे तलाव, घेरडी, तरंगेवाडी, वाकी फाटा, जवळा, देशमुखवस्ती, पाटीलवस्ती व कडलास आदि गावातून चढउतार करून ७० शालेय मुले व प्रवासी सांगोल्याकडे येत असताना या गाडीचा ब्रेक फेल झाला. पाईप फुटली सदरची घटना सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी घडली. घटना घडली ठिकाण ते सांगोला हे अंतर अवघे ७ किमी असताना मनमानी कारभार करणा–या




आगारप्रमखामध्ये वर्कशॉपमधील टीम येथे १० वाजता पोहोचते. सकाळी ११.४५ वाजले तरी ही बस कडलास गावानजीक असलेल्या अभिनव हॉटेलसमोर आहे त्या अवस्थेत उभी होती.

सध्या ११ वी १२ वी च्या मुलांचे ९ जानेवारीपासून पेपर सुरू झाले आहेत. या पेपरची वेळ सकाळी ८ ची होती. त्यामुळै असंख्य मुलांना पहिल्या पेपरसाठी अर्धा ते पाऊण तास उशीर झाला.याला जबाबदार कोण. थाब्यावरून गेली अन् ब्रेक फेल झाला. सदर एसटी कडलास गावातील थांबा घेवून सांगोल्याकडे मार्गस्थ होत असताना ही घटना घडली.गाडीचा वेग खूप कमी होता.त्यामुळे मोठा अनर्थ टळला.याच ब्रेक होण्यापूर्वी डिझेल पाइप फुटली.दरम्यान सलग भाग,खड्डे अन् स्पीड ब्रेकर असल्यामुळे धोका टळला आहे.आज केवळ वर्कशॉपमध्ये गाड्यांची योग्य पद्धतीने देखभाल दुरुस्ती केली जात नसल्याने अशा या घटना घडत आहेत.याला आगारप्रमुखच जबाबदार आहे.याबाबत लोकप्रतिनिधींनी लक्ष देत नसल्याने, यात वाढच होत आहे.

# संपादकीय......

जुने वर्ष–४२ वे
अंक–७ वा

## एमएसपी हमीभावाची मागणी आणि शेतकऱ्यांच्या जीवनाचे रक्षण

पंजाबमधील आंदोलक शेतकऱ्यांनी वाढवलेल्या किमान आधारभूत किमतीला (एमएसपी) कायदेशीर हमी देण्याच्या मागणीमुळे भारताचे कृषी मूल्य समर्थन धोरण पुन्हा एकदा चर्चेचे केंद्र बनले आहे.भारतीय शेती, इतर अर्थव्यवस्थांप्रमाणेच, पीक उत्पादन, काढणीनंतरचे व्यवस्थापन आणि विपणन दरम्यान समाविष्ट असलेल्या विविध जोखमींपासून शेतकऱ्यांचे, विशेषत: अल्पभूधारकांचे उत्पन्न आणि उपजीविकेचे संरक्षण करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. खरेदीसह एमएसपीसह कृषी मूल्य समर्थन धोरण हे शेतकऱ्यांना फायदेशीर किंमत सुनिश्चित करण्यासाठी अशा प्रमुख समर्थन उपक्रमांपैकी एक आहे.

जवळपास सहा दशकांपासून कार्यरत असले तरी, विद्यमान स्वरूपातील किंमत समर्थन धोरण केवळ सरकारी संस्थांद्वारे खरेदी केल्यावरच प्रभावी होते जेव्हा खुल्या बाजारातील किंमती चड्ढ च्या खाली जातात. ३ शेतातील पिकांपैकी, तथापि, सरकारी एजन्सीद्वारे खरेदीचे कार्य मुख्यत्वे तांदूळ, गहू आणि काही प्रमाणात कापूसपर्यंत मर्यादित आहे. दरम्यान, ऊस संपूर्णपणे प्रोसेसर (गिरण्या) एमएसपीवर खरेदी करतात. परिणामी, कडधान्ये, तेलबिया, पौष्टिक तृणधान्ये इत्यादी सारख्या इतर पिकांचे उत्पादन करणारे शेतकरी तांदूळ आणि कापूस यासारख्या पिकांची खरेदी करण्यास परवानगी देणाऱ्या पिकांच्या लागवडीकडे वळत आहेत. यामुळे दोन गंभीर परिणाम झाले आहेत: पहिला, नैसर्गिक संसाधनांचा संपुष्टात येणे आणि प्रदूषण; दुसरे, पोषण सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या डाळी आणि तेलबियांचा तुटवडा.अशा परिस्थितीत, हे असमतोल दुरुस्त करण्याची आणि उत्पादित सर्व पिकांसाठी फायदेशीर किंमत सुनिश्चित करण्यासाठी आणि शाश्वत कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी कृषी समर्थन धोरणे तर्कसंगत करण्याची नितांत गरज आहे.सुरवातीला, शेतकऱ्यांना इतर कोणत्याही क्षेत्रातील उत्पादकांप्रमाणेच फायदेशीर भाव मिळण्याचा हक्क आहे आणि चड्ढ ही अशा किंमतीची सूचक पातळी आहे. तथापि, चड्ढ ची कायदेशीर हमी लागू करण्यासाठी पुरेसा किंवा व्यावहारिकदृष्ट्या व्यवहार्य पर्याय नाही. जरी मंजूर केले असले तरी, कायदेशीर हमी केवळ दंडात्मक कारवाईची तरतूद देऊ शकते जेव्हा व्यवहार एमएसपी हमीभावाची मागणी आणि शेतकऱ्यांच्या जीवनाचे रक्षण पेक्षा कमी किंमतीवर होतो. अशा दंडात्मक कृतींची अंमलबजावणी जटिल आहे. अशा दंडात्मक कारवाईच्या भीतीमुळे खरेदीदारांना किमती खाली आल्यावर नियमन केलेल्या बाजारात व्यापार करण्यास परावृत्त केले जाऊ शकते. कृषी मूल्य समर्थन धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट हे आहे की, शेतकऱ्यांसाठी फायदेशीर किमतीची खात्री करणे, तसेच खुली अर्थव्यवस्था असल्याने उत्पादनातील स्पर्धात्मकतेला चालना देणे. तथापि, सहा दशके जुन्या धोरणामुळे उच्च आर्थिक खर्चावर निवडक पिकांच्या उत्पादनाला चालना देण्यात आली आहे, तसेच पर्यावरणीय प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधने संपुष्टात आली आहेत.

शेतकऱ्यांची सौदेबाजीची शक्ती वाढवून उत्पादित केलेल्या सर्व पिकांना किफायतशीर भाव मिळावा यासाठी कृषी समर्थनाची पुनर्रचना आणि तर्कसंगत करण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन धोरणे आखणे अत्यावश्यक आहे. आवश्यक पायाभूत सुविधा, स्टोरेज आणि लॉजिस्टिकच्या विकासाला चालना देऊन मध्यम ते दीर्घकालीन, प्रोसेसर आणि इतर व्हॅल्यू चेन सहभागींशी थेट विपणन संबंध सक्षम केले जाऊ शकतात. अल्पकालीन, थेट उत्पन्न समर्थन (पीएम–किसान), किमतीतील कमतरता पेमेंट आणि बफर स्टॉक आणि सार्वजनिक वितरणासाठी मर्यादित खरेदी यासह समर्थन धोरणांच्या न्यायपूर्ण मिश्रणासह शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उपजीविका संरक्षित करणे आवश्यक आहे.

वीज, खते इत्यादींसाठी शाश्वत सबसिडी काढून टाकताना सामान्यत: पीक हंगामाच्या सुरुवातीला निविष्ठा खरेदीसाठी पुरवल्या जाणाऱ्या थेट उत्पन्न सहाय्य योजना वाढवल्या जाऊ शकतात. यामुळे रासायनिक खतांचा अतिवापर कमी होण्यास आणि भूजल स्रोतांचा अंत होण्यास मदत होऊ शकते. शाश्वत उत्पादनास प्रोत्साहन देणे. कृषी मूल्य समर्थन धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट हे आहे की, शेतकऱ्यांसाठी फायदेशीर किमतीची खात्री करणे, तसेच खुली अर्थव्यवस्था असल्याने उत्पादनातील स्पर्धात्मकतेला चालना देणे. तथापि, सहा दशके जुन्या धोरणामुळे उच्च आर्थिक खर्चावर निवडक पिकांच्या उत्पादनाला चालना देण्यात आली आहे, तसेच पर्यावरणीय प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधने संपुष्टात आली आहेत.

शेतकऱ्यांची सौदेबाजीची शक्ती वाढवून उत्पादित केलेल्या सर्व पिकांना किफायतशीर भाव मिळावा यासाठी कृषी समर्थनाची पुनर्रचना आणि तर्कसंगत करण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन धोरणे आखणे अत्यावश्यक आहे. आवश्यक पायाभूत सुविधा, स्टोरेज आणि लॉजिस्टिकच्या विकासाला चालना देऊन मध्यम ते दीर्घकालीन, प्रोसेसर आणि इतर व्हॅल्यू चेन सहभागींशी थेट विपणन संबंध सक्षम केले जाऊ शकतात. अल्पकालीन, थेट उत्पन्न समर्थन (पीएम–किसान), किमतीतील कमतरता पेमेंट आणि बफर स्टॉक आणि सार्वजनिक वितरणासाठी मर्यादित खरेदी यासह समर्थन धोरणांच्या न्यायपूर्ण मिश्रणासह शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उपजीविका संरक्षित करणे आवश्यक आहे. वीज, खते इत्यादींसाठी शाश्वत सबसिडी काढून टाकताना सामान्यत: पीक हंगामाच्या सुरुवातीला निविष्ठा खरेदीसाठी पुरवल्या जाणाऱ्या थेट उत्पन्न सहाय्य योजना वाढवल्या जाऊ शकतात. यामुळे रासायनिक खतांचा अतिवापर कमी होण्यास आणि भूजल स्रोतांचा अंत होण्यास मदत होऊ शकते. शाश्वत उत्पादनास प्रोत्साहन देणे.

**जीवन वार्ता**

## ग्रंथातून शिका तणाव दूर करण्यासाठी ५ गोष्टी

### आंधळ्याला जसा प्रकाशाचा अर्थ कळत नाही, त्याचप्रमाणे स्वतः विचार न करणाऱ्याला ग्रंथाचा अर्थ कळत नाही

आजकाल बहुतांश लोकांना तणावाचा सामना करावा लागतो. तणावाची अनेक कारणे असू शकतात जसे काही कामात अपयश, घरगुती समस्या, पैशाची कमतरता, नातेसंबंधातील वाद, आरोग्याशी संबंधित समस्या इ. तणावामुळे मन अशांत होते आणि कोणत्याही कामात एकाग्रता येत नाही. यामुळे जीवन अधिक कठीण वाटते. तणाव दूर करण्यासाठी शास्त्रामध्ये अनेक उपाय सांगण्यात आले आहेत. या टिप्सचा अवलंब केल्याने मन शांत होऊ शकते आणि मग आपण आपले काम चांगल्या प्रकारे करू शकतो.

फक्त तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करा: भगवद्गीतेच्या २ ऱ्या अध्यायात कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन असे लिहिले आहे. भगवान कृष्ण अर्जुनला सांगतात की आपण फक्त आपल्या कृतींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि त्यांच्या परिणामांची चिंता करू नये. परिणामांची अपेक्षा केल्याने तणाव वाढतो आणि अपेक्षित परिणाम मिळत नाहीत तेव्हा निराशा आणखी वाढते. अशा वेळी तणाव टाळायचा असेल तर फक्त कामावर लक्ष केंद्रित करायला हवे. जर तुम्ही तुमचे काम योग्य पद्धतीने आणि धर्मानुसार केले तर जीवनात शांती येईल.

ध्यान करा:पतंजली योग सूत्रानुसार ध्यान केल्याने मनाची चंचलता शांत होते आणि एकाग्रता वाढते. एकाग्र मन इतर गोष्टींमध्ये भरकटत नाही. रोज सकाळी काही वेळ ध्यान करावे. यासाठी शांत ठिकाणी चटईवर बसून डोळे मिटून भुवयांच्या मधोमध असलेल्या अज्ञा चक्रावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करा. ध्यान करताना, तुमच्या मनात कोणताही विचार येऊ न देण्याचा प्रयत्न करा. जेव्हा तुम्ही काही दिवस रोज ध्यान कराल, तेव्हा त्याचा प्रभाव दिसून येईल आणि तुमचे मन शांत होऊ लागेल.तुमच्या जीवनशैलीत ध्यानाचा समावेश करा आणि त्यासोबत काही काळ प्राणायाम देखील करा. तणाव आणि चिंता कमी करण्यासाठी प्राणायाम देखील उपयुक्त आहे. तुम्ही अनुलोम-विलोम आणि कपालभाती सारखे प्राणायाम करू शकता.

समाधानी राहावे:जोपर्यंत आपण आपल्या गोष्टीत समाधानी नाही तोपर्यंत आपल्याला जीवनात शांती मिळू शकणार नाही. रामायण, महाभारत, श्रीमद्भगवद्गीता यांसारख्या ग्रंथांचा संदेश आहे की आपण आपल्या गोष्टीत समाधानी राहावे. जेव्हा आपण इतरांच्या गोष्टींबद्दल मोहित होऊ लागतो आणि अधिक मिळवण्याची इच्छा करतो तेव्हा हे तणावाचे मूळ कारण आहे. परम सुख समाधानामध्ये आहे, जे याचा अवलंब करतात ते तणावापासून दूर राहतात.

निसर्गाशी संपर्क साधा, तीर्थयात्रेला जा आणि प्रवचन ऐका: दैनंदिन जीवनातून विश्रांती घेऊन निसर्गाच्या सानिध्यात राहायला हवे. जेव्हा आपण हिरवाईत राहतो तेव्हा आपले डोळे शांत होतात आणि आपले मन शांत होते. आपण वेळोवेळी तीर्थयात्रा केली पाहिजे. ऋषी-मुनींची प्रवचने ऐकली पाहिजेत. असे केल्याने आपले मन काही काळ निरुपयोगी सांसारिक गोष्टींपासून विचलित होते आणि आपल्याला ताजेतवाने वाटू लागते.

गरजू लोकांची सेवा करा: धर्मग्रंथात दान आणि सेवेला खूप महत्त्व देण्यात आले आहे. देणगी द्या, पण तुम्ही केलेल्या दानाचा कधीही अभिमान बाळगू नका. सेवेने अहंकार शांत होतो. देणगी आणि गरजू लोकांची सेवा केल्याने आशावाद येतो, मनाला शांती मिळते आणि तणाव दूर होतो.

**सुविचार**

**आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत सुखी राहण्याचा प्रयत्न करा, दु:खी राहिल्याने उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीयेत उलट आजचे सुख सुद्धा निघून जाईल.**

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# उदनवाडी येथे तालुकास्तरीय किशोरी हितगुज व जनजागृती मेळावा संपन्न सांगोला पंचायत समितीच्या वतीने लेक वाचवा,लेक शिकवा अभियान संपन्न



सांगोला : सांगोला पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त लेक वाचवा लेक शिकवा अभियान अंतर्गत तालुकास्तरीय किशोरी हितगुज व जनजागृती मेळावा राजूरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच घेण्यात आला.

या मेळाव्यात मुलींसाठी विविध स्पर्धा, कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती,गीतमंच व व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन माजी सभापती राणीताई कोळवले,माजी उपसभापती शोभा खटकाळे, डॉ.प्रज्ञा लवटे, सरपंच प्रतिभा व्हळगर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मारुती सुतार, उपाध्यक्ष गोपीनाथ दबडे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी उपसभापती नारायण जगताप, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मीकांत कुमठेकर, अमोल भंडारी, केंद्रप्रमुख दिनकर गाडे, माधुरी पावले,वैजयंती जाधव, आप्पासो पवार, दिलीप ढेरे, संतोष कांबळे,हेमंत बाबर ,ज्ञानेश्वर कोळेकर, मल्लय्या मठपती, सय्यद काझी, तानाजी साळे,अस्लम इनामदार,अमोगसिद्ध कोळी, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर करांडे आदी उपस्थित होते. जि.प.प्रा.शाळा बाबर–सपताळवाडी शाळेतील विद्यार्थीनी भक्ती प्रशांत केदार ही कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होती.

प्रथम बालिका दिन प्रतिज्ञा शिलेदार वैशाली यांनी सर्व बालिका कडून म्हणून घेतली. त्यानंतर उपस्थित विद्यार्थिनींना व्यायाम व योगाचे महत्त्व व प्रात्यक्षिक रुपाली पवार व सीमा करांडे यांनी करू घेतले. यानंतर गीतमंच स्वरसाधनेच्या माध्यमातून संगीता केसकर, सरला शिर्के,वैशाली शिलेदार,ज्योती पवार, सावित्रा कस्तुरे, सुभाष भजो, एकनाथ गुरव, तानाजी गायकवाड, श्रीनिवास हातेकर, कृष्णदेव शिंदे, अशोक शिंदे, समाधान ढेकळे, शिवाजी गुळीक, आदी शिक्षकांनी शिक्षणाचे महत्त्व,मुलींचे शिक्षण, कृतियुक्त गीते सादर केली. या कार्यक्रमात डॉ.प्रज्ञा लवटे यांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळी व्यवस्थापन व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. तसेच लिंग समभाव,शिक्षणाचे महत्व, स्वच्छता व मुलींचे आरोग्य यावर विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले. माजी जि.प.सदस्य तानाजी सुर्यगण यांनी संविधान विषयक मार्गदर्शन केले. तर मनीषा क्षीरसागर व स्मिता शिंदे यांनी मुलींना गुड टच,बॅड टच याबाबत प्रात्यक्षिकासह सखोल मार्गदर्शन केले व सजग राहण्याचा सल्ला दिला. यावेळी बाळकृष्ण बंडगर यांनी कराटे प्रात्यक्षिके सादर केली.यामध्ये उदनवाडी शाळेतील मुली सहभागी झाल्या होत्या. या मेळाव्यात मुलींसाठी कर्तबगार महिला,बेटी बचाओ–बेटी पढाओ,स्वच्छ विद्यालय–स्वच्छ भारत या विषयावरती पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

रांगोळी, चित्रकला,हस्ताक्षर,लोकनृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. लोकनृत्य स्पर्धा प्रथम क्रमांक जि.प. शाळा वाणी चिंचाळे, द्वितीय क्रमांक जि.प.शाळा गौडवाडी, तृतीय क्रमांक जि.प.शाळा तरंगेवाडी याचे परीक्षक म्हणून अनुपमा गुळमिरे व पल्लवी थोरात यांनी काम पाहिले. पोस्टर स्पर्धा प्रथम क्रमांक महीम शाळा, द्वितीय क्रमांक एखतपूर शाळा, तृतीय क्रमांक तरंगेवाडी शाळा, हस्ताक्षर स्पर्धा प्रथम क्रमांक स्नेहल झंजे एखतपूर शाळा, द्वितीय क्रमांक सृष्टी चव्हाण देवळे शाळा, तृतीय क्रमांक ईश्वरी कांबळे पाचेगाव (बु) शाळा चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक निखद मुलाणी एखतपूर शाळा, द्वितीय क्रमांक राधिका शिंदे पाचेगाव(बु ), तृतीय क्रमांक तेजश्री येजगर वाणीचिंचाळे शाळा, रांगोळी स्पर्धा प्रथम क्रमांक आराध्या गुत्तेदार वाणी चिंचाळे शाळा, द्वितीय क्रमांक सृष्टी चौगुले महीम शाळा, तृतीय क्रमांक अनुष्का माळी गौडवाडी शाळा या शाळांना ट्रॉफी व गुलाबपुष्प देऊन सन्मानित केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शिरभावी केंद्राचे केंद्रप्रमुख माधुरी पावले मॅडम व मांजरी व शिवणे केंद्राचे केंद्रप्रमुख वैजयंती जाधव मॅडम यांनी केले.या कार्यक्रमासाठी अतिशय सुंदर रांगोळी सावित्रा कस्तुरे,सरला शिर्के,सोनल सावंत यांनी काढली. सूत्रसंचालन वंदना पाटणे यांनी केले.तर प्रास्ताविक विस्ताराधिकारी अमोल भंडारी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,केंद्रप्रमुख माधुरी पावले, वैजयंती जाधव, दिनकर गाडे, ज्ञानेश्वर करांडे व शिक्षिका वैशाली शिलेदार, सावित्रा कस्तुरे, सरला शिर्के, संतोष कांबळे,सुखदेव लवटे, सुभाष भोसले, संभाजी पवार, विजयकुमार जावीर, दिनेश गव्हाणे, कस्तुरा पाटील, विमल येडगे,पतंगराव बाबर,कृष्णदेव पवार,संतोष आदाटे,गंगाधर जुंधळे, तोहेरपाशा काझी,सचिन धोकटे,वैशाली भोसले, श्रद्धा जिरगे,लता पाटील,अनिता वारुळे,वर्षा बडे,सोनल सावंत , संगीता केसकर,स्मिता शिंदे, मनिषा क्षीरसागर, व गीतमंच टीम यांचेसह जुनोनी व परिसरातील शाळांमधील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## रोटरी क्लब सांगोला यांच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

सांगोला : रोटरी क्लब सांगोला आणि इंटरॅक्ट क्लब व कै.दत्तात्रय चौगुले विद्यालय यलमार मंगेवाडी यांच्यावतीने कै.दत्तात्रय चौगुले विद्यालय येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक खालील प्रमाणेप्रथम क्रमांक कु.प्रणाली समाधान येलपले इयत्ता नववी, द्वितीय क्रमांक कु.नम्रता नितीन भडंगेइयत्ता नववी, तृतीय क्रमांक कु.स्नेहल अशोक कांबळे. इयत्ता सातवी यांना रोटरी तर्फे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव मिळण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा रोटरीमार्फत घेतल्या जातात.

कार्यक्रमासाठी रोटरी अध्यक्ष रो.इंजि.विकास देशपांडे, रो.इंजि. विलास विले, रो.साजिकराव पाटील, रो.श्रीपती आदलिंगे, रो.अरविंद डोंबे गुरुजी, रो.निळकंठ लिंगे यांच्यासह मुख्याध्यापक श्री.अरुण कोलवळे व इतर शिक्षक वर्ग हजर होता.

## फॅबटेक इंजिनिअरिंगचे प्रा.संजय पवार यांना पीएच.डी.प्रदान

सांगोला:फॅबटेक टेक्निकल कॅम्पस,कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रा.संजय पवार यांना मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली. सांगोला येथील फॅबटेक टेक्निकल कॅम्पस ,कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात प्राध्यापक म्हणून प्रा.संजय पवार काम करत आहेत. त्यांनी सरदार पटेल युनिव्हर्सिटी बालाघाट (मध्यप्रदेश)येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये डिझाइन, मॅन्युफॅक्चरिंग आणि फ्लुइड फ्लो नालिसिस ऑफ स्प्लिट आणि रिकम्बाइन मायक्रोचॅनल्स या विषयामध्ये पीएच.डी पूर्ण केली. यामध्ये त्यांना सरदार पटेल युनिव्हर्सिटी बालाघाटचे कुलगुरू प्रा डॉ. बिप्लब पॉल आणि मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ विमल कुमार चौकसे यांनी मार्गदर्शन केले. प्रा.डॉ.संजय पवार याचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव ता. सांगोला येथे व माध्यमिक शिक्षण हे महात्मा फुले विद्यालय डोंगरगाव येथे झाले आहे. फॅबटेक चे चेअरमन श्री. भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री.दिनेश रुपनर,व्यवस्थापक प्रतिनिधी प्राजक्ता रुपनर , कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय अदाटे यांनीही प्रा.डॉ.संजय पवार यांचे अभिनंदन केले.

## हरवलेल्या मुलाच्या पालकांनी संपर्क साधण्याचे आवाहन



सोलापूर : श्री विठ्ठल मंदिर परिसर, पंढरपूर जि सोलापूर येथून अथर्व निलेशराव देशमुख वय अंदाजे ८ वर्ष विनापालक आढळले आहे. सदर बालकाच्या आई वडिलांनी अथवा त्याच्या इतर नातेवाईकांनी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी किंवा बाल कल्याण समिती, सोलापूर, अथवा जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

सदर बालकास काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समिती, सोलापूर यांच्या आदेशाने जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर येथे दाखल केले असून, बालकाच्या आई वडिलांनी अथवा त्याच्या इतर नातेवाईकांनी ही माहिती प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (श्रीमती गायकवाड रेश्मा संपर्क क्रमांक ९४२०४४७३२९) किंवा बाल कल्याण समिती, सोलापूर, अथवा जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर यांचेशी संपर्क साधावा असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर कळविले आहे.

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा वासुद ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार व सर्वरोग मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



सांगोला:सांगोला तालुक्याचे नूतन नवनिर्वाचित आमदार, हजारो लोकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे हृदयरोग तज्ञ डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा वासुद ग्रामस्थ यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व शाल – श्रीफळ हार, श्री रवींद्र कदम सर लिखित आनंदी जीवनाचे सिक्रेट आनंदवेल हे पुस्तक देऊन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पार पडला. सत्कार सोहळ्यासाठी सांगोला तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉक्टर, सांगोला सहकारी सूतगिरणीचे माजी चेअरमन श्री नानासाहेब लिगाडे, सांगोला खरेदी–विक्री संघाचे सर्व संचालक, वासुद गावातील माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी मेंबर, तसेच शेतकरी कामगार पक्षातील वासुद अकोला गावातील आणि सांगोला तालुक्यातील सर्व नेते मंडळी उपस्थित होते.

आम.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प.प्राथ शाळा वासुद , केदारवाडी ,बाबर मळा– सपताळ मळा यामधील शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले व अंगणवाडी मधील सर्व मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व रोग तपासणी व उपचार शिबिर यांचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रातील मेडिसिन, अस्थिरोग, बालरोग ,स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र, नेत्ररोग ,सर्जरी व मूत्ररोग, फॅमिली फिजिशियन व सर्जन या विभागातील नामवंत डॉक्टर्स यामध्ये डॉ.प्रसाद साळे,डॉ.यशोदीप गायकवाड, डॉ. एच व्ही गावडे,डॉ. राजू जानकर, डॉ.बी यु पाटील, डॉ. संतोष पाटील, डॉ. सुधीर ढोबळे, डॉ. विजय बंडगर, डॉ. मेघना देवकते, डॉ.स्नेहल भोसले, डॉ. अमृता लिगाडे,डॉ.दिव्यता केदार, डॉ. सुनील लवटे,डॉ. विजयसिंह भोसले, चंद्रभागा नेत्रालय चे डॉ. तानाजी वाघमोडे व त्यांचा स्टाफ डॉ.निरंजन केदार, डॉ. जयंत केदार, डॉ.सचिन लिगाडे, संजीवनी लॅबोरेटरीचे श्री प्रवीण कोळेकर , केदार लॅबोरेटरी चे श्री नितीन बंडगर, प्राथमिक आरोग्य केंद्र अकोला वासुद यांचे डॉक्टर संदीप देवकते व सर्व स्टाफ – आशा सेविका यांनी मोफत आरोग्य सेवा दिली, त्याबद्दल आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते वासुद ग्रामस्थ यांच्या वतीने सर्व डॉक्टर्स मंडळींचा येथे सन्मान करण्यात आला. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अकोला वासुद यांचेही सदरच्या शिबिराला विशेष सहकार्य लाभले.

सदरच्या शिबिराला उदंड प्रतिसाद लाभत ३१८ रुग्णांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. ९२ शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली.

# 'निर्भया'कडून महूद येथील रोडरोमिओंवर कारवाई

## टवाळखोर मुले,रोडरोमिओ दारू,गांजा यासारख्या अमली पदार्थांचे सेवन करून शाळेतील मुलींना व त्यांच्या पालकांना धमकाविण्याचे प्रकार

सांगोला : सांगोला पोलीस स्टेशनच्या निर्भया पथकाने अचानक महूद येथील शाळा परिसरास व मुख्य चौकात भेट देत रोडरोमिओ यांचेवर धडक कारवाई केली. अशाप्रकारे वारंवार कारवाई होण्याची आवश्यकता असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

सांगोला तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.अभिषेक कांबळे यांनी सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांना एक निवेदन दिले आहे. निवेदनात त्यांनी सांगोला तालुक्यात चोऱ्या,छेडछाड,मारहाण,खून यासारखे गंभीर प्रकार वाढत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे म्हटले आहे. शिवाय शाळा,महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या मुलींची छेडछाड करणाऱ्या टोळ्या तालुक्यात सर्वत्र वाढत चालल्या आहेत.ही टवाळखोर मुले व रोडरोमिओ दारू,गांजा यासारख्या अमली पदार्थांचे सेवन करून शाळेतील मुलींना व त्यांच्या पालकांना धमकाविण्याचे प्रकार करत आहेत.हे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत.तरीही पोलीस प्रशासन याची कोणतीही गंभीर दखल घेत नसल्याने सामान्य नागरिकांच्या मनामध्ये पोलीस प्रशासनाच्या विषयीची विश्वासार्हता कमी झाली आहे.शाळा, कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींना शाळेत जाणे सुरक्षित वाटत नाही.त्यामुळे तालुक्यात मुलींच्या शिक्षणासाठी निर्भय वातावरण निर्माण व्हावे,यासाठी पोलिसांनी योग्य उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती.या निवेदनाच्या प्रती कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनाही पाठविण्यात आले आहे.

महूद व परिसरातील असंख्य मुली येथील शाळा,कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत.या मुली पायी चालत,सायकलवर,वाहनाने,एसटी बसने शाळेला येतात.तेव्हा सकाळच्या वेळेला तसेच येथील ज्युनिअर कॉलेज सुटताना शिवाय शाळा भरताना व सुटताना येथील मुख्य चौकात तसेच शाळा परिसरात टवाळखोर व रोडरोमिओ यांचा मोठा सुळसुळाट असतो.याबाबत येथील काही शाळांनी यापूर्वीही सांगोला पोलिसात निवेदन देऊन या टवाळखोरांचा व रोडरोमिओंचा बंदोबस्त करण्याची मागणी वारंवार केली होती.मात्र यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने येथे टवाळखोर, गावगुंड आणि रोड रोमिओ तरुणांचे मोठे फावले होते.त्यातून अनेक गंभीर गुन्हेही घडू लागले आहेत.तरीही पोलीस प्रशासन कोणत्याही ॲक्शन मोडवर येताना दिसत नव्हते. आज अचानक निर्भया पथकाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सकाळी लवकर निर्भया पथक दाखल झाले.



महूद येथील शाळा परिसर व मुख्य चौकात रस्त्याने हिंडणाऱ्या टवाळखोर तरुणांना पकडून त्यांच्यावर ११०/११७ प्रमाणे कारवाया केल्या आहेत.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल चव्हाण यांनी येथील श्री शिवाजी विद्यालयात विद्यार्थिनीशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. शिवाय मुलींना काही अडचण असल्यास त्यांनी निर्भया पथकाला ताबडतोब कळवावे असे सांगितले. तसेच मोबाईलच्या अतिरिक्त वापरामुळे व दुरुपयोगामुळे गुन्हेगारी वाढत आहे. तेव्हा त्याचा जपून वापर करावा असा सल्ला दिला.तर विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम ही समजावून सांगण्यात आले. अशाप्रकारे येथील शाळा परिसरात व मुख्य चौकात निर्भया पथकाची वारंवार कारवाई व्हावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## अमर जवान स्तंभाचे काम लवकरच पूर्ण होऊन शहराच्या वैभवात भर पडणार - अच्युत फुले

सांगोला : शहीद जवान बहुउद्देशीय संघटनेने केलेली मागणी लवकरच पूर्णत्वास येत असून चिंचोली रोडवरील बगीचा मध्ये अमर जवान स्तंभाचे काम लवकरच पूर्ण होऊन शहराच्या वैभवात यामुळे नक्कीच भर पडणार असल्याचेमत शहीद जवान बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अच्युत फुले व सचिव संतोष महिमकर यांनी व्यक्त केले.



सांगोला चिंचोली रोड वरील बगीच्या मध्ये अमर जवान स्तंभ उभारण्यात यावा अशी मागणी शहीद जवान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने करण्यात आली होती. या मागणीचा सातत्याने पाठपुरावाही करण्यात आला होता. नगरपालिकेच्या वतीने चिंचोली रोड बगीचा क्रमांक ४७ मध्ये या स्तंभ उभारण्याचा निर्णय झाल्यानंतर गेल्या तीन महिन्याखाली प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली. या कामासाठी तत्कालीन आमदार शहाजीबापू पाटील यांनीही निधी उपलब्ध करून दिल्यामुळे या कामाला गती मिळाली.

शहीद जवानांचे स्मरण, त्यांच्या बलिदानाची महती आपल्या डोळ्यासमोर कायमस्वरूपी राहण्यासाठी आम्ही पाठपुरावा केला व या स्तंभाचे काम पूर्णत्वास आल्याचा आनंद मोठा असल्याचे मत फुले यांनी व्यक्त करत या स्तंभ उभारण्यासाठी सहकार्य करणाऱ्या मुख्याधिकारी सांगोला नगरपरिषद, माजी सैनिक कल्याणकारी संस्था,जय जवान माजी सैनिक सेवा भावी संस्था ,यांनी सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभारही व्यक्त केले.

## जवळा येथे पिकअप दुचाकीचा भीषण अपघात माजी प्राचार्यांचा जागीच मृत्यू



सांगोला : सांगोला तालुक्यातील जवळा येथे पिकअप – दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात माजी प्राचार्य अप्पासाहेब झंगळे (वय ७२) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घराकडून गावाकडे येत असताना भरधाव वेगात आलेल्या पिकअप वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना झंगळे वस्ती येथे घडली.

अप्पासाहेब झंगळे हे अष्टपैलू शिक्षक होते. त्यांना खेळाची विशेष आवड होती. माजी आमदार दीपकआबा साळुंखे–पाटील तसेच जवळा गावातील प्रसिद्ध व्यापारी विलास कोरे यांच्यासोबत त्यांनी क्रिकेटचे अनेक सामने गाजविले. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेला उत्तम खेळाडू, शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. जवळा गावातील कै. सौ. वत्सलादेवी देसाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी केली होती. ते गणित विषयाचे अभ्यासू शिक्षक होते. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने जवळा गावावर शोककळा पसरली आहे. या अपघाताची सांगोला पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

## सांगोला आगारांमध्ये कमीत कमी ६५ गाड्यांची अत्यंत आवश्यकता–विकास पोपळे

सांगोला: सांगोला आगारांमध्ये सध्या ५३ एसटी बस सुरू असून या गाड्यांद्वारे २८८ फेऱ्या सुरू आहेत. सध्याच्या फेऱ्यानुसार सांगोला आगारांमध्ये कमीत कमी ६५ गाड्यांची अत्यंत आवश्यकता आहे. एसटी बसच्या कमी संख्येमुळेच वेळापत्रकांमध्ये अनेक वेळा बदल करावे लागत आहे. लांब पल्ल्यांच्या गाड्यांबरोबरच ग्रामीण फेऱ्यांकडेही आम्ही विशेष लक्ष देत आहोत. प्रवासी व विशेषतः विद्यार्थ्यांची होणारी गैरसोयी आम्ही टाळण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू, असा विश्वास आगार व्यवस्थापक विकास पोपळे यांनी व्यक्त केला.

सांगोला एसटी आगारामध्ये सध्या ५३ एसटी बस गाड्यांद्वारे २८८ फेऱ्या सुरू आहेत. कालबाह्य झालेल्या गाड्याही सध्या वापरात असल्यामुळे अनेक छोट्या मोठ्या अपघातांना निमंत्रण मिळत आहे. सांगोला आगारांमध्ये पूर्वी ७२ गाड्या होत्या. फेऱ्यांची संख्या लक्षात घेता सांगोला आगारासाठी कमीत कमी ६५ बसची आवश्यक आहेत. सांगोला एसटी आगार हे एसटी बसचे मध्यवर्ती ठिकाण मानले जाते. कोकणातून व कोल्हापूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात सांगोल्यावरून पुढे पंढरपूर, सोलापूर बस जात असतात. सांगोला आगारांमध्ये सध्या फक्त ५३ एसटी बस सुरू आहेत. यामध्येही दोन ते तीन बस आरटीओ व इतर कामासाठी गेलेल्या असतात. एखादी दुसरी गाडी त्याच्या बिघाडामुळे आगारात बंद असते.

सध्या शैक्षणिक सहली सुरू असून यासाठी दररोज सात ते आठ गाड्या द्याव्या लागतात. फक्त ५३ बस गाड्यांवर व इतर कामांसाठी गेलेल्या बसमुळे सध्या सुरू असणाऱ्या २८८ फेऱ्या तरी कशा मारायच्या असा प्रश्न उपस्थित होत आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये कमीत कमी ६५ बस गाड्या अत्यंत आवश्यक आहेत. पूर्वी सांगोला आगारांमध्ये ७२ बस गाड्या सुरू होत्या. बस गाड्यांची संख्याच कमी असल्यामुळे फेऱ्यांच्या वेळापत्रकाच्या अडचणीला तोंड द्यावे लागत असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची बस अभावी होतेय मोठी गैरसोय सांगोला तालुक्यामध्ये शंभरपेक्षा जास्त गावे आहेत. या गावांमधून सांगोला शहरात विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात दररोज ये–जा करीत असतात. विद्यार्थ्यांना आपल्या गावावरून शैक्षणिक वेळेमध्ये येणे जाणे अत्यंत कठीण बनले आहे.

सांगोला आगाराकडे बसची संख्या नगण्य असल्यामुळे काही गावांना एसटी बस पाठवणे अत्यंत अवघड होत आहे. एसटी मिळाली तरी ती वेळेवर येत नसल्यामुळे मुलांचे अतिशय हाल होत आहेत. एका एसटी बसमधून जवळ जवळ १०० पेक्षा जास्त मुले सकाळी येत असतात. एवढ्या मोठ्या विद्यार्थी एकाच एसटी मधून येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. शाळेत जाण्या अगोदरच सकाळ सकाळीच विद्यार्थ्यांची मानसिकता एसटीमुळे बिघडलेली असते. सांगोला आगारांमध्ये सध्या फक्त ५३ बसवरच सर्व फेऱ्या अवलंबून आहेत. सध्या २८८ फेऱ्यांमध्ये ग्रामीण भागांमध्ये सर्वाधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. बस गाड्या कमी असल्यामुळे या अगोदर सुरू असणाऱ्या पुणे, मुंबई, आदमापुर व इतर शहरांमध्ये जाणाऱ्या एसटी बस बंद करण्यात आल्या आहेत. सध्या सांगोला आगारांमध्ये सुरू असणाऱ्या बसेस साडेतेरा लाख किलोमीटर एवढी सरासरी झाली आहे. काही गाड्या १५ लाख किलोमीटर चालल्या असूनही त्या अद्याप सुरू आहेत. सांगोला आगाराला नवीन बसेस मिळणार तरी केव्हा ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.




निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता